# देशाचा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामिण भाग विकासाला चालना देणारा अर्थसंकल्पावर रंगले बोदवड येथे प्राध्यापक –विद्यार्थी यांचे चर्चासत्र

या वर्षाचे केंद्र सरकारचे अंदाजपत्रक शेती आणि ग्रामिण भागाचा विकासाच्या दृष्टीने महत्वपुर्ण असून त्याचे दिर्घकालीन फायदेशीर परिणाम होतील असा विश्वास कला वाणिज्य व विज्ञान बोदवड महाविद्यालयात दि.5 फब्रुवारी 2018 रोजी वाणिज्य व नियोजन मंडळाने आयोजित केलेल्या अर्थसंकल्पावरील प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या चर्चेत व्यक्त करण्यात आला.या चर्चेत वाणिज्य व अर्थशास्त्रचे प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

चर्चासत्राचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांनी केले.या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य अरविंद चौधरी यांनी केंद्र सरकारकाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास वाणिज्य व अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यानी सुक्षपणे अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करुन मनातल्या प्रतिक्रीया व्यक्त केल्या पाहिजे त्यासाठी असे चर्चासत्र उपयुक्त ठरतात, विद्यार्थ्यांनी त्यासाठी लेखन करुन अंदाजपत्रकाचे विशेषण प्रसिद्ध करावे असे आवहन केले.

चर्चासत्रात वाणिज्य विभागाचे डॉ. सुरेश वराडे, डॉ. पी.एस महाले, डॉ. एस.एस. काठोके, अर्थशात्र विभागाचे प्रा. ढी.एस.पाटील, श्रीमती हेमलता कोटेचा यांचे सह विद्याथी व विद्यार्थीनी सहभागी झाले.

या चर्चेत शेतीसाठीच्या, औद्योगिक क्षेत्राच्या व्यवसाय क्षेत्राच्या विविध तरतूदी व त्यापाठोमागचे धोरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चासत्र यशस्वि करण्यासाठी उपप्राचार्य डी.एस.पाटील ,समिती अध्यक्ष श्रीमती हेमलता कोटेचा,प्रा.डॉ. पी.एस.महाले, डॉ,काठोके, डॉ.वराडे यांनी सहकार्य केले. या उपक्रमास वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.



बोदवड कॉलेजमध्ये देशाच्या अर्थसंकल्पावर आयोजित चर्चासत्रात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक.